जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 AUG 2025
लोकमत

# शैक्षणिक, संशोधनात शिवाजी विद्यापीठ देशात उत्कृष्ट

**कोल्हापूर :** शैक्षणिक व संशोधन उत्कृष्ट या निकषावर आऊटलूक आयसीएआरईच्या मानांकनात शिवाजी विद्यापीठाने राज्यात चौथा क्रमांक पटकावला आहे. विद्यापीठाने ८३१.३३ गुणांसह राष्ट्रीय पातळीवर ४० वा क्रमांक मिळवला.

विद्यापीठाला शैक्षणिक व संशोधन उत्कृष्टता निकषात सर्वाधिक ३६९.१९ गुण मिळाले आहेत. इंडस्ट्रीज इंटरफेस अँड प्लेसमेंटमध्ये १७१.७८, सोयी-सुविधांसाठी ११८.१४, प्रशासन आणि विस्तार कार्य १०९.८३ गुण मिळाले आहेत. यापूर्वी शिवाजी विद्यापीठ ५१-१०० या रँकबँडमध्ये होते. आयसीएआरई मानांकनामध्ये १-५० या रँकबँडमध्ये पोहोचले आहे.

या मानांकनात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ देशात तिसरे आणि महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आहे. मुंबई विद्यापीठ दुसऱ्या तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ तिसऱ्या स्थानी आहे.

"

या मानांकनातून शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधनविषयक कामगिरीतील उत्कृष्टतेवर शिक्कमोर्तब झाले.

**-डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 AUG 2025
पुढारी

# आऊटलूक मानांकनात विद्यापीठ राज्यात चौथे

## शैक्षणिक, संशोधनात देशात उत्कृष्ट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शैक्षणिक व संशोधन उत्कृष्ट या निकषावर 'आऊटलूक' आयसीएआरईच्या मानांकनात शिवाजी विद्यापीठाने राज्यात चौथा क्रमांक पटकावला आहे. विद्यापीठाने ८३१.३३ गुणांसह राष्ट्रीय पातळीवर ४० वा क्रमांक मिळवला आहे.



विद्यापीठाला शैक्षणिक व संशोधन उत्कृष्टता निकषात सर्वाधिक ३६९.१९ गुण मिळाले आहेत. इंडस्ट्रीज इंटरफेस अँड प्लेसमेंटमध्ये १७१.७८, सोयी-सुविधांसाठी ११८.९४, प्रशासन आणि विस्तार कार्य १०९.८३ गुण मिळाले आहेत. यापूर्वी एनआयआरएफ रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठ ५१-१०० या रँकबँडमध्ये होते. आयसीएआरई मानांकनामध्ये १-५० या रँकबँडमध्ये पोहोचले आहे. मानांकनात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ देशात तिसरे आणि महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकावर आहे. मुंबई विद्यापीठ दुसऱ्या, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ तिसऱ्या स्थानी आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 5 AUG 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाला आऊटलूक आयसीएआरई मानांकन

प्रतिनिधी
कोल्हापूर

आऊटलूक आयसीएआरई-२०२५ मानांकन गुरुवारी जाहीर झाले आहे. यामध्ये शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय पातळीवर ४० वा तर राज्यात चौथा क्रमांक मिळाला आहे.विविध पाच निकषांमध्ये ८३१.३३ गुण मिळाले आहेत. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाकडून आनंद व्यक्त केला.

आऊटलूक आयसीएआरई या मानांकनातील निकषांमध्ये विद्यापीठाला शैक्षणिक व संशोधन उत्कृष्टता निकषात सर्वाधिक ३६९.१९गुण मिळवले आहेत. इंडस्ट्रीज इंटरफेस अँड प्लेसमेंटमध्ये १७१.७८, सोयी-सुविधांसाठी ११८.९४, प्रशासन आणि विस्तार कार्य १०९.८३, तर विविधता आणि समाजसंबंध निकषात ६१.५९ गुण मिळाले आहेत. एनआयआरएफ रँकिगमध्ये विद्यापीठ ५१-१०० या रँकबँडमध्ये होते. आता या आयसीएआरई मानांकनामध्ये १-५० या रँकबँडमध्ये पोहोचले असून राष्ट्रीय पातळीवर विद्यापीठाचा क्रम उंचावला आहे. टॉप-७५ विद्यापीठांना मानांकन मिळाले आहे.

तरुण भारत संवाद



विद्यापीठातून

**पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट कामगिरी**

आऊटलूक आयसीएआरई मानांकनातून राष्ट्रीय पातळीवर पुन्हा एकदा शिवाजी विद्यापीठाची शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध झाली आहे. उत्कृष्ट संशोधनावर शिक्कमोर्तब झाले आहे.

**- डॉ. डी. टी. शिर्के (कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 5 AUG 2025
तरुण भारत

# कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आज ध्वजारोहण

**कोल्हापूर :** भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात सकाळी ८ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. संगीत व नाट्यशास्त्रच्या विद्यार्थीनी गायन करणार आहेत. त्यानंतर मुलांच्या वसतिगृहानजीकच्या जीमचे उद्‌घाटन केले जाणार आहे. प्र-कुलगुरू पी. ए. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह सर्वच अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

15 AUG 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्र विकासात राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाचे महत्त्व : कुलगुरू डॉ. शिर्के

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्र विकासात राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाचे (एनएसओ) महत्त्व आहे. विद्यार्थ्यांनी 'एनएसओ'मार्फत उपलब्ध असलेल्या डेटाचे सखोल विश्लेषण करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, उपक्षेत्रीय कार्यालय व शिवाजी विद्यापीठ संख्याशास्त्र अधिविभागाच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणची ७५ वर्षे' या विषयावर एकदिवसीय जनजागृती कार्यशाळा झाली. यावेळी ते बोलत होते. पहिल्या सत्रामध्ये डॉ. रुही कुलकर्णी यांनी राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या ७५ वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतला.

अजय कुमार यांनी 'आवधिक श्रम बल सर्वेक्षण' व वरुण कुमार यांनी 'असंघटित क्षेत्रातील उद्यमांचे वार्षिक सर्वेक्षण' यासारख्या प्रमुख सर्वेक्षणांवर मार्गदर्शन केले. कार्यशाळेत संख्याशास्त्र विषयाचे अधिविभागातील व संलग्न महाविद्यालयांतील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त नोंदवला. सिद्धार्थ सिंग यांनी सूत्रसंचालन केले. अभिषेक आगरे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. एस. बी. महाडिक, डॉ. रुही कुलकर्णी, वेदांत कोंडकर, प्रा. एस. व्ही. राजगुरू आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 5 AUG 2025

पुढारी

# तरुणांनी ध्येय प्राप्तीसाठी स्वप्नांना प्रयत्नांची जोड द्यावी : डॉ. पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आजच्या तरुणांनी ध्येय प्राप्तीसाठी स्वप्नांना प्रयत्नांची आणि कृतीची जोड दिली पाहिजे. शिक्षण आणि स्वत:वरील विश्वास ही यशाची शस्त्रे आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले.



**कोल्हापूर : युवा दिनानिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. पाटील.**

जागतिक युवा दिनानिमित्त 'ज्ञान, कौशल्य आणि जबाबदारी : नवयुगातील युवकांची ओळख' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान आयोजित केले होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे होते. यावेळी डॉ. चांगदेव बंडगर, विविध अधिकारी, समन्वयक, सहायक प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. पाटील म्हणाले, प्रत्येक तरुणाने विचार, वर्तन आणि कृतीने तरुण राहिले पाहिजे. स्वत:च्या व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच कुटुंब, समाज आणि देशाच्या प्रगतीची स्वप्ने पाहिली पाहिजेत. ती पूर्ण करण्यासाठी जिद्द आणि परिश्रम आवश्यक आहेत. युवकांची ऊर्जा व शक्ती समाज परिवर्तनासाठी महत्त्वाची असून, आव्हानांना सामोरे जाताना कटुता टाळावी. सहकार्य, सकारात्मकता आणि आदर ही तरुणाची भाषा असली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

स्वागत व प्रास्ताविक डॉ. संजय चोपडे यांनी, पाहुण्यांची ओळख डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी करून दिली. सूत्रसंचालन डॉ. प्रवीण लोंढे यांनी केले. आभार डॉ. सचिन भोसले यांनी मानले.